मासिक

# स्वराज दुनिया

संपादक : शिवाजी बबन खेडकर मो. नं. ८०५५७२२११०

■ RNI No. : MAHMAR/2024/89748
■ DECL NO : SDM/SR/06/2024 Dt. : 16/02/2024
■ unoindia1977@gmail.com

■ वर्षे २ रे ■ अंक १ ■ मार्च २०२५ ■ मुल्य : २५ रु ■ वार्षिक वर्गणी : २५० रु. ■ पान ४

## टीम इंडियाची चॅम्पियन्स ट्रॉफी फायनलमध्ये धडक

**दुबई :** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेत भारतीय क्रिकेट संघाने रोहित शर्मा याच्या नेतृत्वात इतिहास घडवला आहे. टीम इंडियाने चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक दिली आहे. टीम इंडियाने उपांत्य फेरीत ऑस्ट्रेलियावर ४ विकेट्सने विजय मिळवला आहे.


ऑस्ट्रेलियाने टीम इंडियाला विजयासाठी २६५ धावांचं आव्हान दिलं होतं. टीम इंडियाने हे आव्हान ४८.१ ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून पूर्ण केलं. टीम इंडियाने २६७ धावा केल्या. विराट कोहली हा या विजयाचा नायक ठरला. तसेच श्रेयस अय्यरसह इतरांनीही विजयात निर्णायक योगदान दिलं. टीम इंडियाचा हा या स्पर्धेतील सलग चौथा विजय ठरला. तसेच टीम इंडियाने या विजयासह २०२३ वनडे वर्ल्ड कप फायनलमधील पराभवाचा वचपाही घेतला.

## पुण्यातून दोन कोटींच्या खंडणीसाठी हिरे व्यापाऱ्याचे अपहरण

**पुणे :** दोन कोटी रुपयांच्या खंडणीसाठी शहरातून एका हिरे व्यापाऱ्याचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. बिबवेवाडी भागात सोमवारी सायंकाळी सहा ही घटना घडली. अपहरण झालेल्या हिरे व्यापाऱ्याच्या पत्नीने बिबवेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानुसार आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हिरे व्यापारी बिबवेवाडी भागातील एका सोसायटीत राहिला आहेत.ते हिरेजडीत दागिने करतात. सोमवारी सायंकाळी व्यापारी आणि त्यांची पत्नी मुलीला शाळेतून आणण्यासाठी सॅलिसबरी पार्क परिसरात गेले होते. शाळेतून घेतल्यानंतर मुलगी आणि पत्नीला घरी सोडले. काही कामानिमित्त लष्कर भागात जाणार असल्याचे सांगितले. सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास व्यापाऱ्याच्या पत्नीच्या मोबाईलवर संपर्क साधण्यात आला. अनोळखी व्यक्तीने मैने आपके पति को उठाया है, दो करोड तयार रखो, आपके ससुर जी को बोलो, दो घंटे मे फोन करेंगे असे म्हणत जिवेमारण्याची धमकी दिली.

# अखेर धनंजय मुंडेंचा राजीनामा

**मुंबई :** बीडच्या केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच दिवंगत संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला ८० दिवस उलटले आहेत. अद्याप या प्रकरणातील कोणत्याही आरोपीला शिक्षा झालेली नाही. दरम्यान, याप्रकरणी सीआयडीने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केलं. या दोषारोप पत्रातून अनेक खुलासे झाले आहेत. मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय म्हणून ओळखला जाणारा वाल्मिक कराड हाच या हत्याकांडाचा सूत्रधार असल्याचं दोषारोप पत्रात म्हटलं आहे. दुसऱ्या बाजूला सीआयडीच्या दोषारोप पत्रातून या घटनेचे काही फोटो समोर आले आहेत. काळीज चिरणारे ते फोटो पाहून राज्यभरातून संतापाची लाट उसळली. वाल्मिक कराड व त्याच्या टोळीविरोधात कठोर कारवाई करण्याची, धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी तीव्र झाली होती. दरम्यान, घटनेच्या ८० दिवसांनंतर, देशमुख कुटुंबाच्या संघर्षानंतर अखेर धनंजय मुंडे यांनी



आज (४ मार्च) त्यांचा राजीनामा दिला आहे. मुंडे यांनी त्यांच्या स्वीय सहाय्यकामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला आहे.

धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर वेगवेगळ्या प्रकारच्या प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावर दोन वाक्यात प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले, धनंजय मुंडे यांनी नुकताच त्यांचा राजीनामा दिला आहे. त्यांनी नैतिकतेवर राजीनामा दिला आहे.

तत्पूर्वी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधीमंडळाबाहेर प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, आज राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांनी माझ्याकडे आपला राजीनामा दिला आहे. त्यांचा राजीनामा मी स्वीकारला आहे. पुढील कार्यवाहीसाठी मी तो राजीनामा राज्यपालांकडे पाठवला आहे. धनंजय मुंडे यांचा राजीनामा स्वीकारून आम्ही त्यांना त्यांच्या जबाबदाऱ्यांमधून मुक्त केलं आहे.

संतोष देशमुख यांची डिसेंबर २०२४ मध्ये अपहरण करून निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती. त्यानंतर या प्रकरणात सात आरोपींना अटक करण्यात आली आहे. तर, एक आरोपी अद्याप फरार आहे. २७ फेब्रुवारी रोजी, राज्य गुन्हे अन्वेषण विभागाने बीड जिल्हा न्यायालयात याप्रकरणी तब्बल १,२०० पानांचे दोषारोपपत्र सादर केले. ज्यामध्ये देशमुख यांच्या हत्येचा आणि त्यासंबंधित आणखी दोन गुन्ह्यांच्या प्रकरणांचा समावेश आहे. बीडमधील केज पोलिस ठाण्यात सरपंच देशमुख

### माझ्या भावाची अत्यंत क्रूरपणे छळ करून हत्या

**बीड :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे क्रूर फोटो समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर, मनोज जरांगे पाटील यांनी आज सकाळीच मस्साजोग गावाला भेट देऊन संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांची भेट घेतली. मनोज जरांगे पाटील यांना दारात पाहताच धनंजय देशमुख यांना अश्रू अनावर झाले आणि त्यांनी हंबरडा फोडला. लहान मुलाप्रमाणे ते जरांगे यांच्या गळ्यात पडून रडले. या हृदयद्रावक दृश्यामुळे उपस्थितांचे डोळे पाणावले. जरांगे यांनी धनंजय देशमुख यांचे सांत्वन केले, मात्र त्यांनाही अश्रू आवरणे कठीण झाले. यावेळी मस्साजोग गावचे काही ग्रामस्थही उपस्थित होते, आणि तेदेखील या घटनेने सुन्न झाले होते. धनंजय देशमुख यांच्या दु:खात संपूर्ण गाव सहभागी झाल्याचे चित्र दिसत होते. चार्जशीटमधून समोर आलेले भयानक राक्षसी कृत्य आणि मारहाणीच्या घटनेतील फोटो पाहून संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांना अश्रू अनावर झाले, तर या ८ आरोपींना पाठबळ मिळाल्यानेच त्यांची इथपर्यंत मजल केल्याचेही धनंजय यांनी म्हटले.

## गळफास घेऊन १९ वर्षांच्या युवकाची आत्महत्या

**शिरूर :** मलठण , ता . शिरुर येथील १९ वर्षाच्या युवकाने राहत्या घरी गळाफास घेवून आत्महत्या केली आहे .तन्मय रामदास कदम वय -१९ वर्षे, रा. मलठण ता. शिरूर जि. पुणे असे आत्महत्या केलेल्या युवकाचे नाव आहे. याबाबत पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार रामदास सत्तू कदम वय ४२ वर्षे व्यवसाय शेती रा. मलठण ता. शिरूर जि. पुणे. यांनी याबाबतची माहिती पोलीस स्टेशनला दिली आहे . २ मार्च रोजी रात्री सव्वाबाराचा दरम्यान तन्मय हा गावातील वरातीला जावून घरी झोपण्यासाठी आला व शेजारील खोली मध्ये दार लावून झोपला होता त्यानंतर ३ मार्च रोजी दुपारी रामदास कदम यांनी मुलगा तन्मय याला तो झोपलेल्या खोलीचा दरवाज्या वाजून गोठ्यातील फॅन चालू कर म्हणून आवाज दिला होता परंतू त्यांने काही एक आवाज दिला नाही. त्यानंतर तन्मय याचा भाउ ऋषभ यांने दुपारी जनावरांना खादय आण्यासाठी गाडीची चावी घेण्यासाठी तन्मय झोपला त्या खोलीचा दरवाजा वाजवला असता तन्मय यांने खोलीचा दरवाजा उघडला नाही म्हणून ऋषभ यांने खोलीचे खिडकी उघडून आत डोकावून पाहिले असता तन्मय यांने खोलीचे लोखंडी अँगलला गळफास घेतल्याचे दिसले . ऋषभ यांने आवाज देवून वरील प्रकार वडिल रामदास यांना सांगितला . ते खोलीचा दरवाज्या तोडून आत गेले असता मुलगा तन्मय यांने खोलीचे लोखंडी अँगलला गळफास घेतल्याचे दिसले.

## तरुणीवर दोन जणांकडून अतिप्रसंग, आरोपींना अटक

**शिरुर :** कारेगाव , ता शिरुर येथे रात्रीच्या वेळी मामेभाउ व बहिण असे दोघे गप्पा मारत असताना दोन जणांनी त्यांना चाकूचा धाक दाखवून मारहाण करत तरुणीकडील सोन्याचे दागिने काढून घेऊन तीच्यावर दोघा जणांनी अतिप्रसंग केल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी अमोल नारायण पोटे (वय २५) रा. संस्कृती डेव्हलपर्स पवार बिल्डींग, कारेगाव ता. शिरुर जि. पुणे मुळ (रा. ढोकराई फाटा, ता. श्रीगोदा जि. अहील्यानगर) आणि किशोर रामभाऊ काळे (वय २९) रा. संस्कृती डेव्हलपर्स, लेन नं.१, कारेगाव ता. शिरुर जि.पुणे मुळ (रा. किल्ले धारूर, ता.धारुर जि. बीड) अशा दोन आरोपींना पोलीसांनी अटक केली आहे.

यासंदर्भात पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार संबधित तरुणी आणि तिचा मामेभाऊ रात्रीच्या



वेळी घराच्या काही अंतरावर गप्पा मारत बसले होते. त्यावेळी दोन जण आले. त्यांनी संबधित तरुणी आणि तिच्या मामे भावाला त्यांच्याकडील चाकूचा धाक दाखवून जीवे मारण्याची धमकी दिली. जबरदस्तीने एकमेकांना चुंबन व शरीर संबध करण्यास भाग पाडले आणि त्यांच्याकडील मोबाईलमध्ये फोटो व व्हिडीओ शुटींग काढून घेतले. त्यानंतर संबधित तरुणीच्या मामे भावाला त्यातील एकाने थोड्या अंतरावर नेले आणि त्यापैकी एकाने पीडितेवर अतिप्रसंग केला. त्याच्यानंतर दुसऱ्याला बोलावून घेऊन पहिला युवक मामेभावाकडे गेला. त्यानंतर दुसऱ्याने संबधित तरुणीवर अतिप्रसंग केला आणि तरुणीच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरी करून निघून गेले.

या नंतर संबधित तरुणीने घरी जाऊन घडलेला सर्व प्रकार बहिणीस सांगितला. बहिणीच्या पतीने डायल ११२ वर कॉल करुन सदर प्रकारची माहीती पोलिसांना दिली. त्यानंतर पोलिसांनी आरोपी अमोल नारायण पोटे आणि किशोर रामभाऊ काळे या दोघांना ताब्यात घेतले. या घटनेचा तपास पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली केला जात आहे. आरोपीना शिरुर न्यायालयात हजर केले असता ७ मार्च २०२५ पर्यंत पोलिस कोठडी सुनावली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी दिली .

## प्रक्षोभक वक्तव्ये करणाऱ्या पुढाऱ्यांना सेन्सॉर का नाही?

**सोलापूर :** जबाबदारीच्या पदावर असलेले राजकीय नेते दररोज सामाजिक आणि धार्मिक तेढ निर्माण करणारी प्रक्षोभक वक्तव्ये करतात. त्यांच्यावर सेन्सॉर का नाही, असा सवाल करीत ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांनी, सेन्सॉर बोर्डावर नाट्य आणि सिनेमा क्षेत्राचा काडीचाही संबंध नसलेली माणसे काम करतात आणि मग ते सांगतात हे नको ते नको. त्यामुळे चांगल्या नाटकाची आणि सिनेमाची वाट लागते, अशी खंत व्यक्त केली.'प्रिसिजन फाउंडेशन' आयोजित 'प्रिसिजन वाचन अभियान' या कार्यक्रमात अमोल पालेकर हे प्रकट मुलाखत देताना बोलत होते.

डॉ. अस्मिता बालगावकर यांनी घेतलेल्या मुलाखतीत अमोल पालेकर व संध्या गोखले यांनी आपला जीवन प्रवास उलगडून दाखवला. सुरुवातीला 'ऐवज एक स्मृतिगंध' या अमोल पालेकर लिखित आत्मचरित्राचे प्रकाशन प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्षा डॉ. सुहासिनी शहा यांच्या हस्ते करण्यात आले. या पुस्तकात वापरलेल्या क्यूआर कोडमुळे त्या काळातल्या त्यांच्या चित्रपटांसह नाटक आणि पोस्टरचे दर्शन घडतं. ही एक अभिनव कल्पना 'ऐवज एक स्मृतिगंध' या आत्मचरित्राच्या निमित्ताने मराठी साहित्यात प्रथमच आणली.

यावेळी बोलताना अमोल पालेकर म्हणाले की, सत्यदेव दुबेंकडून खूप शिकायला मिळालं. शब्द, वाक्य, न बदलता त्याचा अन्वयार्थ वेगळा कसा शोधायचा हे मला त्यांच्याकडून शिकायला मिळालं. स्त्री ही कणखर असतेच. कितीही हालअपेष्टा झाल्या तरी ती ठामपणे उभी राहते. बाई ही अतिशय कर्तबगार असतेच. माझ्या आईपासून पुढे ज्या स्त्रिया माझ्या आयुष्यात आल्या त्या अशाच भेटल्या. त्यामुळे स्त्रीवादी कलाकृती घडल्या. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या लढ्यात रसिकांनी, सामान्य लोकांनी मनापासून उतरावं. तेही काठावरून नाही. आपल्या धोतरावर डाग पडणार नाहीत नां, अशी भीती न बाळगता या लढ्यात उतरावं, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

सेन्सॉरशिपच्या विरोधात जेव्हा विजय तेंडुलकर, सत्यदेव दुबे उभे राहिले, तेव्हा रसिकांनी त्यांना साथ दिली नाही, अशी खंतही पालेकर यांनी व्यक्त केली. आजही एखादी घटना घडते, तेव्हा लोक त्याचे चित्रिकरण करतात. पण तिथे जाऊन अन्याय थांबवत नाही, ही दुर्दैवी बाबही त्यांनी नमूद केली. आपण नास्तिक असणं याचा नकारात्मक अर्थ घेतो. मी नास्तिक आहे. तुम्ही तसंच व्हावं असं मुळीच म्हणणं नाही. माझी श्रद्धा माणसांवर आहे, माणुसकीवर आहे..! आज आपण 'एआय'च्या दुनियेत आहोत, जिथे माणसाच्या कर्तृत्वावरच प्रश्नचिन्ह उभे राहायची वेळ आलीय, असे मत अमोल पालेकर यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार माधव देशपांडे यांनी मानले.

# संपादकीय

## साहित्य संमेलनातील धुळवड!

९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे रविवारी सूप वाजले. माणसे खूप चांगली आहेत. त्यांच्यात एकमेकांविषयी आदर आहे. त्यामुळे केवळ राजकारणामुळे माणसात भेदभाव होऊ नये याची काळजी आपण घेतली पाहिजे अशी अपेक्षा संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी व्यक्त केली. संमेलनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत आदी राजकारण्यांची उपस्थिती होती. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतरचे हे पहिले संमेलन होते. या पार्श्वभूमीवर राज्य सरकार आणि साहित्यिकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. आतापर्यंतच्या संमेलनांमधून मराठी माणसाला, मराठी भाषेला नेमका काय लाभ झाला असा प्रश्न पडतो. या वेळच्या संमेलनाध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांची भूमिका मात्र रोखठोक आणि डोळ्यात अंजन घालणारी होती. डॉ. भवाळकर या लोकसंस्कृतीच्या अभ्यासक आहेत. त्यांची दृष्टी पुरोगामी आहे. त्यांनी भाषा व संस्कृती या जाती-धर्माचे भेद मानत नाहीत हे अधोरेखित केले. भाषा ही तोडणारी नव्हे तर जोडणारी आहे असे पंतप्रधानांच्या उपस्थितीत सुनावले. मराठी भाषेला दोन हजार वर्षांची परंपरा आहे. प्राकृत मराठीपासून आजच्या अभिजात मराठीपर्यंत साहित्याचे विविध प्रवाह आले. परंतु हे प्रवाह नदीच्या मुळासारखेच असतात. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल आनंद व्यक्त करतानाच त्यांनी भाषणात मराठीबद्दल चिंताही व्यक्त केली. कारण अभिजात दर्जा प्राप्त झाला तरी ती व्यवहारात वापरली गेलीच नाही तर ती टिकणार कशी आणि तिचा विकास होणार कसा? हा डॉ. भवाळकर यांनी केलेला प्रश्न योग्यच होता. कारण दरवर्षी शेकडो मराठी शाळा बंद पडत आहेत आणि वर्षातले तीन दिवस मराठीविषयी चिंता व्यक्त केली जाते. परंतु हे संमेलन साहित्यिकांचे की राजकारण्यांचे असा संभ्रम निर्माण झाला. कारण या संमेलनावर राजकारण्यांचे वर्चस्व दिसून आले. यात मराठी भाषेतील दिग्गज साहित्यिकांपेक्षा राजकारण्यांना अधिक महत्त्व दिले गेल्याचे दिसून आले. राज्य शासनाकडून प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीमध्ये पंतप्रधान, मुख्यमंत्री, दोन उपमुख्यमंत्री आणि भाषा मंत्र्यांचे फोटो दिसून आले पण संमेलनाध्यक्ष डॉ. भवाळकर यांचा फोटो नव्हता. साहित्य संमेलनात परिसंवाद, चर्चा, मुलाखती आणि कविसंमेलन होते पण मुलाखतीतून राजकीय चिखलफेकच करण्यात आली. वास्तविक मराठी भाषा, साहित्य आणि तिच्या संस्कृतीचे वैभव जगासमोर यावे हा संमेलनाचा हेतू असतो. परंतु संमेलन हे सरकारी अनुदानावर होते. त्यामुळे राजकारणी लोकांना बोलवावे लागते. पूर्वी साहित्य संमेलनामध्ये राजकारण्यांचा पैसा नको व राजकारणही नको असे ठामपणे सांगणारे साहित्यिक होते. खरे तर साहित्य महामंडळाने आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वतंत्र होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे पण तसे होत नाही. आताची संमेलने म्हणजे राजकीय मेळावा होत चालला आहे. साहित्य संमेलन आणि वाद ही अलिकडच्या काळातील प्रथा या संमेलनातही चालू राहिली. हे संमेलनही साहित्यापेक्षा साहित्यबा कारणांनी जास्त गाजले. दिल्लीतील या साहित्य संमेलनातील अनेक चर्चासत्रे आणि परिसंवाद हे साहित्यबा होते असा आक्षेप घेतला गेला. त्यातही राजकीय टीका-टिप्पणी अधिक झाल्याने वादाला तोंड फुटले. यंदाही साहित्य संमेलनात दरवर्षीप्रमाणे निरर्थक वाद उद्भवल्यामुळे साहित्यप्रेमी रसिकांच्या आनंदावर विरजण पडले. अर्थात याची सुरुवात महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्काराने सुरू झाल्याचे दिसले. संमेलनाच्या अखेरच्या दिवशी 'आम्ही असे घडलो' मुलाखतीच्या कार्यक्रमात शिवसेना शिंदे गटात सामील झालेल्या नेत्या डॉ. नीलम गो-हे यांनी बेताल वक्तव्य केले. त्या म्हणाल्या, ठाकरेंच्या शिवसेनेत दोन मर्सिडीज दिल्या की एक पद मिळत असे. या वक्तव्यावरून खळबळ माजली. स्वत: एकही निवडणूक न लढवता उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेकडून फुकट चार वेळा विधान परिषदेची थेट आमदारकी आणि दोन वेळा विधानसभेचे उपसभापतिपद घेणा-या नीलम गो-हे यांनी साहित्य संमेलनाच्या मंचावरून असे आरोप केल्याने सारे अवाक् झाले. ठाकरे गटाने त्यांच्यावर कठोर टीका केली. भाजपाने सावरायचा प्रयत्न केला तर शिंदे गटाने मौन पाळले. राजकीय स्वार्थापोटी रिपब्लिकन पक्ष सोडून शिवसेना आणि आता शिंदे गट असा प्रवास करत आपली विचारधारा आणि पक्ष यांना सतत तिलांजली देणा-या नीलम गो-हे यांनी इतके हास्यास्पद विधान करावे याचे राजकीय वर्तुळात आश्चर्य व्यक्त होत आहे. नीलम गो-हे यांच्या वक्तव्यावर ठाकरे गटाने सणसणीत प्रत्युत्तर दिले. उद्धव ठाकरे म्हणाले, कुठे आहेत मर्सिडीज, दाखवा ना. हे सगळे गयेगुजरे लोक आहेत. एक महिला म्हणून त्यांचा आदर जरूर आहे. राजकारणात त्यांनी त्यांचे चांगभले केले आहे ते तसेच राहू द्या. आमदार अंबादास दानवे म्हणाले, नीलमताई चार वेळा विधान परिषदेच्या आमदार राहिल्या मग त्यांनी आठ मर्सिडीज दिल्या का? दोन वेळा विधान परिषद उपसभापती राहिलेल्या नीलमताईंनी असे विधान करावे याला नमकहरामी याशिवाय दुसरा शब्द नाही. नीलम गो-हेंविरोधात ठाकरे गट आक्रमक झाला असून ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमेला जोडे मारण्यात आले. गो-हेंविरोधात अब्रुनुकसानीचा दावा ठोकण्याचा इशारा ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी दिला. नीलम गो-हेंचे वक्तव्य ही विकृती असल्याचे खा. संजय राऊत म्हणाले. संमेलनात कार्यक्रम ठेवण्यासाठी अ. भा. मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे यांना ५० लाख रुपये दिल्याचा आरोप राऊत यांनी केला. नीलम गो-हे यांचे वक्तव्य म्हणजे मूर्खपणा आहे अशा शब्दांत राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी फटकारले आहे. या आधी गणेश नाईक यांनीही पक्ष सोडला पण पक्ष सोडल्यावर त्यांनी कधीही ठाकरे गटावर टीका केली नाही. आज जे ठाकरेंच्या पुण्याईवर मोठे झाले ते सत्तेच्या मस्तीने आंधळे झाले आहेत असे दिसते. नीलमताईंनी उद्धव ठाकरे यांच्यावर वैयक्तिक टीका करून आपला सुसंस्कृतपणा व सद्सद्विवेकबुद्धी सत्तेपुढे गहाण ठेवल्याचे दिसून येते. राजकारणामुळेच आज माणसामाणसात भेदाभेद करण्यात येत असल्याची डॉ. तारा भवाळकर यांची खंत खरी असल्याचे जाणवते आहे. डॉ. नीलम गो-हे यांनी असे वक्तव्य करायला नको होते, कारण त्यामुळे मराठी साहित्य संमेलन ऐतिहासिक होण्याऐवजी राजकीयच झाल्याचे वास्तव नाकारता येत नाही.

## 'पुणे तेथे गुन्हे'

विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणारे पुणे आता गुन्ह्यांचे, गुन्हेगारांचे माहेरघर म्हणून ओळखले जाईल. 'पुणे तेथे काय उणे' असे मोठ्या अभिमानाने म्हटले जायचे आता 'पुणे तेथे गुन्हे' अशी नाचक्की होईल. असे होण्यामागे बुधवारी पुण्यातील स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये एका २६ वर्षीय तरुणीवर सराईत गुन्हेगाराने केलेला बलात्कार कारणीभूत आहे. दिल्लीतील 'निर्भया' बलात्कार आणि हत्या प्रकरणाच्या स्मृती अद्यापही ताज्या असतानाच बुधवारी पहाटे स्वारगेट बस स्थानकात उभ्या असलेल्या 'शिवशाही' बसमध्ये एका तरुणीवर बलात्काराची धक्कादायक घटना उघडकीस आल्याने राज्यभर खळबळ उडाली आहे. पीडित तरुणीने स्वारगेट पोलिसांना याबाबत माहिती दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यामध्ये आरोपी कोण आहे ते स्पष्ट झाले. आरोपीचे नाव दत्तात्रय रामदास गाडे असे असून तो 'रेकॉर्ड'वरील गुन्हेगार आहे. त्याच्याविरुद्ध दोन गुन्हे दाखल आहेत. पीडित मुलगी पुण्यात काम करते. ती फलटणला जाणार होती. पहाटे साडेपाचच्या सुमारास ती बसची वाट बघत होती. त्यावेळी आरोपी तिच्याजवळ गेला आणि तिच्याशी काहीतरी बोलत असल्याचे फुटेजमध्ये दिसले. त्यानंतर तिच्या शेजारचा माणूस उठून निघून गेल्याचे दिसले. आरोपीने गोड बोलून तिचा विश्वास संपादन केला आणि 'ताई' कुठे जायचे आहे असे विचारले. मुलीने फलटणला जायचे आहे असे सांगितल्यानंतर ती बस इथे नाही दुस-या ठिकाणी लागते असे सांगितले. तुला त्या बसमध्ये बसवतो असे सांगितल्याने ती मुलगी आरोपीसह बसजवळ जाताना फुटेजमध्ये दिसते. बसमध्ये अंधार होता त्याचा फायदा घेत आरोपीने तिच्यावर बळजबरी करत बलात्कार केला. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल केला असून आठ पथकांमार्फत शोधमोहीम सुरू केली आहे. बस स्थानक परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीची ओळख पटली असून त्याला लवकरच अटक करण्यात येईल असा दावा पोलिसांनी केला आहे. ही घटना समोर आल्यानंतर बस स्थानक परिसरातील सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज यामुळे अधोरेखित झाली आहे. या घटनेतील आरोपीला अटक करण्याबरोबरच राज्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत म्हणून राज्य सरकारकडून कठोर उपाययोजना केल्या जाव्यात अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. तसेच महिला सुरक्षिततेसाठी महत्त्वाचा असणारा 'शक्ती' कायदा राज्यात त्वरित लागू करण्याबाबत राज्य सरकार निर्णय घेईल अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. स्वारगेट बसस्थानकात तरुणीवर एकदा नव्हे तर दोनदा अत्याचार झाल्याचे स्पष्ट झाले आहे. ससून रुग्णालयाच्या वैद्यकीय अहवालातून ही बाब स्पष्ट झाली आहे. स्वारगेट बसस्थानकाच्या आवारात दिवाळीत प्रवाशांकडील ऐवज चोरून नेण्याच्या एकापाठोपाठ पाच ते सहा घटना घडल्या होत्या. एसटी स्थानकाच्या आवारात प्रवाशांच्या पिशवीतून दागिने तसेच मोबाईल चोरीच्या घटना घडतात. एसटी स्थानकाच्या आवारातील चोरी तसेच गुन्हे रोखण्यासाठी पोलिसांनी नियमित गस्त घालण्याची गरज स्वारगेट, शिवाजी नगर, पुणे स्टेशन एसटी स्थानकाच्या आवारात प्रवाशांकडील ऐवज चोरीला जाण्याच्या घटना नेहमीच घडतात. त्यासाठी स्थानकातील सीसीटीव्ही कॅमे-यांची संख्या वाढवण्याची गरज आहे. राज्याची सांस्कृतिक नगरी, सुधारणावादी चळवळीचे केंद्र, विद्येचे माहेरघर, ऐतिहासिक घटनांचे साक्षीदार अशा अनेक विशेषणांनी पुण्याची महती गायिली जायची पण गत दशकभरात या पुण्यनगरीने स्वत:चीच बदनामी करून घेण्याचा सपाटा लावला आहे की काय अशी शंका येते. देशाच्या दाही दिशांतून हजारो विद्यार्थी पुण्यात केवळ शिक्षणासाठी येतात. इथे असलेले गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे वातावरण हे विद्यार्थ्यांच्या भवितव्याला आकार देणारे ठरते अशी लोकांची अजूनही धारणा आहे. आता तर तंत्रज्ञानाने अशी काही भरारी मारली आहे की सर्व प्रकारच्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी निगडीत अभ्यासक्रम पुण्यात शिकवले जातात. पुण्यातील शिक्षण संस्थांची संख्या सुमारे पाच पटींनी वाढली आहे. औद्योगीकरण अथवा माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्वाचे केंद्र म्हणूनही पुण्याने आघाडी मारली आहे. हिंजेवाडी आणि आजूबाजूचा परिसर आयटी हब म्हणून ओळखला जातो आहे. पुण्याची लोकसंख्याही दुपटीने वाढली आहे. या वाढत्या लोकसंख्येचे तितकेच चित्रविचित्र परिणाम पुण्यात पहावयास मिळत आहेत. गत काही वर्षांत गुन्हेगारीचा आलेखही वाढला आहे. त्यामुळे पुण्याला लागू होणारी सारी विशेषणे मुळा-मुठात विसर्जित झाल्याचे चित्र दिसत आहे. कोयता गँग, तलवार गँग, ड्रग्जचा वाढता प्रसार, व्यभिचार, अत्याचार आणि भ्रष्टाचारातही पुणे अव्वलस्थानी आले आहे. 'पुणे तिथे काय उणे' असे मोठ्या अभिमानाने म्हटले जायचे पण आता 'पुणे तिथे गुन्हेच गुन्हे' असे शरमेने म्हणायची वेळ आली आहे. स्वारगेट बस स्थानकात शिवशाही बसमध्ये मुलीवर झालेला बलात्कार ही पुण्यातल्या गुन्हेगारीची ताजी आवृत्ती म्हणावी लागेल. आता कायद्याचा धाक राहिलेला नाही असे खेदाने म्हणावे लागते. गुन्हेगारीला मिळणारे अभयच त्याला कारणीभूत आहे. गत वर्षभरात महिलांवरील अत्याचारांबाबत महाराष्ट्र ढवळून निघाला आहे. बदलापूरमध्ये विद्यार्थिनीवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात जनतेचे उत्स्फूर्त आंदोलन, आरोपीबरोबर झालेल्या ख-या-खोट्या चकमकीतील त्याचा मृत्यू आदी घटना अजूनही ताज्या आहेत. त्यातील जनभावना दुर्लक्षित करता येत नाही. सरकारी स्तरावर जे काही कठोर कायदे अपेक्षित आहेत ते व्हायचे तेव्हा होतील परंतु समाजात असलेली या संदर्भातील चीड अधिक महत्त्वाची ठरते. महिला अत्याचाराविरोधात आंध्र प्रदेशमध्ये 'दिशा' विधेयक आणले गेले परंतु त्याला अजून कायद्याचे स्वरूप प्राप्त झालेले नाही. महिलांवर अत्याचार झाल्यानंतर पुढील वीस दिवसांत आरोपीला शिक्षा ठोठावण्याची तरतूद त्यात आहे. तसा कायदा महाराष्ट्रातही आणण्याची घोषणा झाली परंतु अजूनही त्या कायद्याचा विचार झालेला दिसत नाही. म्हणजेच महिलांवरील अत्याचाराला तातडीने आळा बसावा अशी इच्छाशक्तीच राज्यकर्त्यांमध्ये दिसत नाही. महिला सुरक्षिततेसाठी वेगवेगळे कायदे आहेत परंतु त्यांची भीतीच राहिलेली नाही. गुन्हेगारी किंवा विकृतीच्या प्रवृत्तींनी पुण्याला विळखा घातला आहे हेच स्वारगेटमधील अत्याचार प्रकरणावरून दिसून येते.

## 'सब कुछ विराट'

सध्या क्रीडा जगतात आयसीसीची चॅम्पियन्स चषक क्रिकेट स्पर्धा सुरू आहे. पाकिस्तान या स्पर्धेचा यजमान देश आहे. सध्या जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पाकिस्तान दारिद्र्य रेषेखाली आहे. एक वेळच्या जेवणालाही हा देश महाग आहे. तब्बल दीड दशकानंतर आयसीसी स्पर्धा आयोजित करण्याची संधी मिळाल्यामुळे या देशाची आर्थिक भरभराट होईल, अशी आशा निर्माण झाली होती; परंतु या देशाला अतिरेकी कारवाया नडल्या. हिंसक गोष्टींमुळे कोणताही देश पाकिस्तानमध्ये खेळण्यास उत्सुक नव्हता. भारताने तर या देशावर बहिष्कारच टाकला आहे. दोन्ही देशांमधील अहि-नकुल सख्य जगप्रसिद्ध आहे. म्हणून ही स्पर्धा जाहीर झाल्यानंतर भारताने पाकिस्तानमध्ये खेळण्यास नकार जाहीर केला. क्रिकेट जगतात भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचा दबदबा आहे. भारताकडे 'सोन्याची कोंबडी' म्हणून पाहिले जाते. स्पर्धेत भारताचा सहभाग नाही म्हटल्यानंतर प्रेक्षक स्टेडियमकडे पाठ फिरवणार, पर्यायाने स्पर्धा आयोजित करणा-या देशाला आर्थिक फटका अस होणार हे निश्चित होते त्यामुळे भारताने स्पर्धेत सहभागी व्हावे म्हणून मिनतवा-या सुरू झाल्या. अखेर भारताने आपले सामने पाकमध्ये न खेळता दुबईत खेळावेत, असा तोडगा काढण्यात आला. भारतानेही स्पर्धेत खेळण्यास होकार दिला आणि यजमान पाकिस्तानच्या जीवात जीव आला! चॅम्पियन्स स्पर्धेत एकूण ८ देशांचा सहभाग आहे त्यांना २ गटांत विभागण्यात आले आहे. 'अ' गटात भारत, पाकिस्तान, न्युझिलंड आणि बांगलादेशाचा समावेश आहे तर 'ब' गटात ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, द. आफ्रिका आणि अफगाणिस्तान हे देश आहेत. दुबईत भारताचा बांगलादेशविरुद्ध पहिला सामना झाला आणि त्यात भारताने दणदणीत विजय मिळवला. भारताचा दुसरा सामना यजमान पाकिस्तानविरुद्ध होता. नेहमीप्रमाणे दोन्ही देशातील ही लढत महामुकाबला म्हणून गणली गेली. भारत-पाक सामना म्हटला की त्यात दोन्ही देशांची इभ्रत, इज्जत पणाला लागलेली असते. दोन्ही देशांचे पाठीराखे आपापल्या संघांना 'करो या मरो' असे सुनावत असतात. या स्पर्धेचा चषक आपल्या देशाला मिळो वा न मिळो; परंतु ही लढत जिंकलीच पाहिजे यावर दोन्ही देशांच्या चाहत्यांचा भर असतो. त्याच इर्षेने दोन्ही देशांचे प्रेक्षक तहान-भूक विसरून स्टेडियमकडे धाव घेतात आणि डोळ्यात प्राण आणून सामना पाहतात. आपले इप्सित साध्य झाले की त्या देशाचे पाठीराखे विजयाचा 'भांगडा' करतात आणि अपयशी संघाचे पाठीराखे डोक्यात राख घालून घेतात, ओक्साबोक्सी रडतात आणि घरात बसून सामना पाहणा-यांचे दूरदर्शन संच यमसदनाला जातात! २३ फेब्रुवारी रोजी दुबईच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर असेच काहीसे घडले. भारत आणि पाकिस्तानमध्ये आणखी एक पारंपरिक लढत झाली आणि नेहमीप्रमाणेच भारताने पाकवर वर्चस्व राखले. गत काही वर्षांपासून दोन्ही देशांत बिघडलेल्या राजकीय संबंधामुळे आयसीसी स्पर्धा अथवा आशिया चषकाच्या निमित्तानेच चाहत्यांना या २ संघांतील थरार पहायला मिळतो. २०१७ च्या चॅम्पियन्स ट्रॉफित पाकिस्तानने अंतिम सामन्यात भारताला नमवले होते त्यामुळे या वेळी भारताला त्या पराभवाचा वचपा काढण्याची उत्तम संधी होती. त्या दृष्टीनेच भारताने या लढतीत खेळ केला. अलिकडे क्रिकेटच्या तिन्ही प्रकारांत भारताने आपला दबदबा निर्माण केला आहे. भारतीय संघातील तरुणाई चांगलीच बहरली आहे. प्रश्न होता तो रोहित शर्मा आणि विराट कोहली या बुजुर्गांचा. दोघांचेही फॉर्मसाठी 'ढुंढो ढुंढो रे साजना' सुरू होते. त्यातही 'रोहिट'ला फॉर्म गवसला होता. विराटचे मात्र वर्षभरापासून 'निशाना चूक ना जाये'चे प्रयत्न सुरू होते. त्याचे या सामन्यात 'कभी आर-कभी पार' संपणार काय? हा लाख मोलाचा प्रश्न होता. त्याचे उत्तरही या सामन्यात मिळाले. पाकविरुद्ध विराट उभा राहिला की 'मुर्देमे भी जान आती है'! असो. पाकचा कर्णधार मोहम्मद रिझवानने टॉस जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. रिझवान डोळे झाकून माळ ओढत पाकसाठी दुवा मागत होता. माळ ओढल्याने दुवा मिळत नसते मिळते ती चौकार, षटकार ओढल्याने; पण हे रिझवानला सांगणार कोण? कदाचित नंतर हे त्याच्या लक्षात आले असेल म्हणूनच त्याने विराटचे पाय धरले होते! बाबर आझम आणि इमाम उल हकने ब-यापैकी सुरुवात केली. बाबर आझमला पाकमध्ये 'किंग कोहली' म्हणून ओळखले जाते म्हणे; परंतु अखेर 'बाप, बाप होता है' हे विराटची खेळी पाहून त्याच्या लक्षात आले असेल. हार्दिक पांड्याने बाबरचा (२६) काटा काढला आणि पाकला पहिला 'कांटा लगा'. इमाम एक चोरटी धाव घेण्याच्या प्रयत्नात 'बापू'च्या थेट फेकीवर धावबाद झाला. इमाम हा इंझमाम उल हकचा पुतण्या. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इंझमाम हा ३५ वेळा धावबाद झाला आहे! रिझवान आणि सौद शकीलने तिस-या विकेटसाठी १०४ धावांची भागीदारी केली आणि संघाचा डाव सावरला; परंतु त्यासाठी त्यांनी १४४ चेंडू खाल्ले. इथेच पाकच्या पराभवावर पहिला खिळा ठोकला गेला. रिझवान (४६) आणि सौद शकील (६२) बाद झाल्यानंतर पाकिस्तानची फलंदाजी ढेपाळली. ४९.४ षटकांत २४१ धावांत पाकचा संघ आडवा झाला. कुलदीपने ३ तर हार्दिकने २ बळी घेतले. लक्ष्याचा पाठलाग करताना १५ चेंडूत २० धावा काढून रोहित शर्मा बाद झाला. त्यानंतर गिल-विराटने तिस-या विकेटसाठी ६९ धावांची भागीदारी केली. रोहितची दांडी उडवणा-या शाहीन आफ्रिदीवर गिलने हल्ला चढवला होता. ४६ धावा काढून गिल बाद झाला तेव्हा भारताची २ बाद १०० अशी स्थिती होती. नंतर कोहली-श्रेयस जोडीने ११४ धावांची भागीदारी करून भारताचा विजय पक्का केला. श्रेयस ५६ धावांवर बाद झाला. विराट शतकाजवळ पोहोचला तेव्हा त्याचे शतक होऊ नये म्हणून शाहीनने ३ वाईड चेंडू टाकले. पाक खेळाडूंची ही रणनिती खिलाडूवृत्तीला साजेशी नव्हती. अखेर विराटने चौकार ठोकत संघाला विजय मिळवून देताना स्वत:चे शतकही पूर्ण केले. त्याने १११ चेंडूत नाबाद १०० धावा काढल्या. वन डेमधील त्याचे हे ५१ वे तर आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील ८२ वे शतक. आजही त्याचा फिटनेस इतका अफलातून आहे की, एकेरी-दुहेरी धावा काढताना तो तरुण खेळाडूंच्या तोंडाला फेस आणतो. नोव्हेंबर २०२३ नंतर विराटने प्रथमच एकदिवसीय शतक ठोकले आहे. त्याने १४ हजार धावांचा विक्रम प्रस्थापित केला आहे. या सामन्यावर 'सब कुछ विराट'ची छाप होती. 'किंग विराऽऽऽट' असा गजर केला जातो तो उगाच नाही!

printed by SHIVAJI BABAN KHEDKAR, and published by SHIVAJI BABAN KHEDKAR, Owner by SHIVAJI BABAN KHEDKAR on behalf of Marathi Magazine SWARAJ DUNIYA, printed at M/s. Shree Samarth Printers, Appa Balwant Chowk, Near Prabhat Theatre, 535, Shanivar Peth, Pune - 411030 (Maharashtra) and published at Property No. 2585, Gat No. 1026, Old Bhambarde Road, Ranjangaon Ganpati, Tal. Shirur, Dist. Pune - 412209 (Maharashtra) Editor - SHIVAJI BABAN KHEDKAR

मुद्रक शिवाजी बबन खेडकर आणि प्रकाशक शिवाजी बबन खेडकर मालक शिवाजी बबन खेडकर यांचे नावे मराठी मासिक स्वराज दुनिया, श्री समर्थ प्रिंटर्स, अप्पा बळवंत चौक, प्रभात थेअटरच्या जवळ, ५३५, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र). द्वारे मुद्रित करुन आणि प्रकाशन ठिकाण : प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे – ४१२२०९ (महाराष्ट्र).
संपादक : शिवाजी बबन खेडकर

## प्रत्येक बालकाला सशक्त आणि निरोगी जीवनाची हमी देण्याचे काम करुया

**पुणे :** राज्य शासन प्रत्येक बालकांचे आरोग्य व उज्वल भविष्याची जबाबदारी पूर्ण निष्ठेनी पार पाडेल; सर्वांनी मिळून राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत आयोजित विशेष तपासणी मोहीम यशस्वी करुया व या माध्यमातून प्रत्येक बालकाला सशक्त आणि निरोगी जीवनाची हमी देण्याचे काम करुया, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले.

औंध येथील इंदिरा गांधी मॉडेल स्कूल येथे आयोजित राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत विशेष तपासणी मोहिमेचा शुभारंभ आणि राज्यस्तरीय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे (दूरदृष्यप्रणालीद्वारे) तर व्यासपीठावर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, पुणे महानगर पालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, शहरी आरोग्य सेवा संचालक डॉ. स्वप्नील लाळे, अतिरिक्त संचालक डॉ. बबिता कमलापूरकर आदी उपस्थित होते.

श्री. पवार म्हणाले, सार्वजनिक आरोग्य विभाग, एकात्मिक बाल विकास विभाग, शिक्षण विभाग, आदिवासी विभाग, नगर विकास विभाग यांच्या समन्वयाने राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाअंतर्गत राज्यातील ० ते १८ वर्षापर्यंतची बालके तसेच किशोरवयीन मुला-मुलींची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे. याअंतर्गत ६ हजार शाळांमधील १४ लाख विद्यार्थी आणि ३० हजार अंगणवाडीतील २० लाख बालकांची डोक्यापासून ते नखा पर्यंत वैद्यकीय तपासणी करण्यात येणार आहे. तसेच यामाध्यमातून बालकांच्या आरोग्य विषयी माहिती मिळणार आहे. पहिल्याच टप्प्यात शारीरिक, मानसिक आजाराचे निदान होऊन त्यांच्यावर वेळेत मोफत उपचार करता येणार आहे, अशा प्रकारचा उपक्रम हाती घेतल्याबद्दल सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस श्री. पवार यांनी शुभेच्छा दिल्या.

ते पुढे म्हणाले, बालकांचे आरोग्य एखाद्या कुटुंबापुरते मर्यादित नसून ते समाज, देशाच्या उज्वल भविष्याकरीता महत्वाचे असते. त्यामुळे राज्यातील बालके सदृढ असली पाहिजे, त्याचे आरोग्य चांगले असले पाहिजे, अभ्यासात प्राविण्य मिळवले पाहिजे, यापद्धतीने सुदृढ व जबाबदार नागरिक घडविण्याचे काम केले पाहिजे. बालकांना जन्मजात कुपोषण, नेमिया, डोळे व दाताचे आजार, हृदयरोग, कुष्ठरोग आदीप्रकारचे आजार असतात त्यामुळे त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते, या मोहिमेचा माध्यमातून अशा बालकांवर शासकीय रुग्णालय, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत असलेल्या रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टराद्वारे वेळेत उपचार, शस्त्रक्रिया करण्यात येणार असल्याने गरजू बालकांना मोठ्या प्रमाणावर याचा लाभ होणार आहे.

## भोर येथील विक्रम दादासाहेब गायकवाड या तरुणाच्या हत्येची महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाकडून गंभीर दखल

**पुणे :** भोर तालुक्यातील उत्रोली येथील विक्रम दादासाहेब गायकवाड या अनुसूचित जातीमधील उच्चशिक्षित तरुणाची झालेली निर्घृण हत्या ही अत्यंत निंदनीय व मनाला क्लेश देणारी निघृण घटना असून महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाने या घटनेची अत्यंत गंभीर दखल घेतली असल्याचे आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी सांगितले. शांतता सलोखा टिकवणे ही शासन, प्रशासन व संपूर्ण जनतेची देखील जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले.

बारामती येथे माध्यम प्रतिनिधींशी शुक्रवारी (२८ फेब्रुवारी) संवाद साधताना ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, विक्रम गायकवाड या तरुणाची दि. ८ फेब्रुवारी रोजी हत्या झाल्याची घटना घडली. त्या अनुषंगाने भोर येथे त्याचे आई, बहीण, भाऊ, काका आणि परिसरातील लोकांशी भेट घेऊन चर्चा केली. तसेच अतिरिक्त पोलीस आयुक्त गणेश बिरादर, भोर प्रांताधिकारी विकास खरात, जिल्हाचे समाज कल्याण सहाय्यक आयुक्त विशाल लोंढे आणि तपास अधिकारी पोलीस उपअधीक्षक तानाजी बर्डे यांच्यासोबत बैठक घेऊन या प्रकरणाबाबत चर्चा केली.

विक्रम याच्या परिवारावर झालेला अन्याय आयोग खपवून घेणार नाही असे सांगून त्यांनी पुढे सांगितले, या प्रकरणात विक्रमच्या परिवाराने संपूर्ण पोलीस तपासावर शंका व्यक्त केली आहे. विक्रमचा नोंदणीकृत पद्धतीने विवाह झाला होता त्या मुलीच्या संपूर्ण परिवारावर विक्रमच्या कुटुंबीयांचा आक्षेप आहे. या हत्येच्या अनुषंगाने अनुज उर्फ बाबू मल्हारी चव्हाण (वय २४ वर्षे) हा आरोपी स्वतः पोलीसांसमोर हजर झाला असून पोलिसांनी त्याला संशयित आरोपी म्हणून ताब्यात घेतले असून हाच आरोपी असल्याच्या प्राथमिक निष्कर्षाप्रत पोलीस पोहोचलेले आहेत. तथापि, हा 'ऑनर किलिंग'चा प्रकार असावा अशा पद्धतीची शंका घेत मृतक विक्रम गायकवाड यांच्या कुटुंबीयांनी मुलीच्या परिवारावर आक्षेप घेतला आहे.

या प्रकरणाच्या अनुषंगाने तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष भरत नारायण शिवतारे यांच्याशी देखील चर्चा केली असून त्यांनी ४ ते ८ फेब्रुवारीपर्यंतचा संपूर्ण घटनाक्रम कथन केला.

## राष्ट्रीय विधि विद्यापीठे व मुंबई उच्च न्यायालयाच्या इमारतींच्या बांधकामांना गती द्यावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** राज्यातील राष्ट्रीय विधि विद्यापीठे आणि मुंबईतील उच्च न्यायालयाच्या वांद्रे येथील इमारतीच्या बांधकाम या कामांना गती देवून ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी व मुंबई उच्च न्यायालयाच्या बीकेसी कॉम्प्लेक्स संदर्भात बैठक झाली. यावेळी सर्वो च्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे, न्यायमूर्ती आर व्ही घुगे, न्यायमूर्ती एन डब्ल्यू सांबरे, न्यायमूर्ती ए एस किलोर, न्यायमूर्ती डांगरे, न्यायमूर्ती श्री. कर्णिक, न्यायमूर्ती श्री चांदोरकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी, सचिव डॉ श्रीकर परदेशी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील राष्ट्रीय विधि विद्यापीठे आणि मुंबईतील उच्च न्यायालयाच्या वांद्रे येथील इमारतीच्या बांधकामाच्या कामांना गती देण्यासाठी सर्व संबंधित विभाग व यंत्रणांनी समन्वयाने काम करुन ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

यावेळी राष्ट्रीय विधि विद्यापीठाच्या व मुंबई उच्च न्यायालयाच्या वांद्रे येथील इमारतीच्या बांधकामासंदर्भातील प्रगती अहवाल सादर करण्यात आला.

### विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्याहस्ते रस्त्याचे लोकार्पण

**सांगली :** सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगली मिरज रस्ता ते सिनर्जी हॉस्पिटल हनुमान मंदिर ते एस. टी. वर्कशॉप ते कारंजा ते चिमणी रस्त्याचे लोकार्पण विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्याहस्ते झाले. त्यांच्या हस्ते रस्ता कामाच्या कोनशिलेचे अनावरण करण्यात आले.

यावेळी खासदार विशाल पाटील, आमदार इद्रिस नायकवडी, आमदार सुरेश खाडे, आमदार डॉ. विश्वजीत कदम, महापालिका आयुक्त शुभम गुप्ता, मिरजचे उपविभागीय अधिकारी उत्तम दिघे, महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता क्रांतिकुमार मिरजकर, शहर अभियंता पृथ्वीराज चव्हाण, समित कदम, डॉ. रवींद्र आरळी आदि उपस्थित होते.

## संतांच्या शिकवणीतून मराठवाड्याला संघर्षशीलतेचा मंत्र मिळाला : अजित पवार

**नांदेड :** स्वातंत्र्यपूर्व काळापासून मराठवाड्याला सहजासहजी काही भेटले नाही.तरीही मराठवाड्याने संघर्ष सोडला नाही.सहनशक्ती आणि संघर्षशीलता मराठवाड्याच्या संतांनी दिलेली शिकवण आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केले.

उपमुख्यमंत्री अजित पवार नांदेड व परभणी जिल्ह्याच्या एक दिवसाच्या दौऱ्यावर आले आहेत. नांदेड वरून हेलिकॉप्टरने जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील धाकटे पंढरपूर म्हणून प्रसिद्ध असणारे श्री.क्षेत्र उमरज येथील प्राचीन श्री. संत नामदेव महाराज संस्थान मंदिराच्या कलशारोहण सोहळ्यानिमित्त १०८ कुंडी विष्णुयाग यज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह तथा श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. अडीचशे वर्षाची परंपरा आणि सात मठाधिपतींनी आत्तापर्यंत या ठिकाणी आध्यात्मिक कार्य केले आहे. यासाठी या परिसरातील हजारो भाविक उपस्थित झाले होते.आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनात हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्त भाविकांशी आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संवाद साधला.

यावेळी मंचावर सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार विक्रम काळे, तसेच आंतरराष्ट्रीय ख्यातीचे कथा प्रवक्ते देवकीनंदन जी ठाकूर महाराज,संत नामदेव महाराज संस्थान उंबरजचे श्री.संत महंत एकनाथ नामदेव महाराज यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आगमनानंतर येथील नामदेव महाराज समाधीचे व विठ्ठल रखुमाई मंदिराचे दर्शन घेतले. संस्थांच्यावतीने त्यांचे आगमनाप्रती स्वागत करताना खोबऱ्याच्या भव्य हाराने परंपरेनुसार स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित भाविकांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मराठवाड्यातील संत परंपरेचा गौरव केला. मराठवाड्याची भूमी संतांची ,कलावंतांची, शूरांची व विरांची असून मराठवाड्याला संघर्षाशिवाय सहजासहजी काही मिळाले नाही. मात्र संतांच्या शिकवणीतून संघर्षशीलता व संयम हे गुण या ठिकाणच्या मातीमध्ये आले आहे. संतांच्या शिकवणीतून सर्वधर्मसमभावाचा मंत्र बुलंद व्हावा. या ठिकाणचा आध्यात्मिक सोहळा सामाजिक एकोप्याची नांदी ठरावी, अशा शुभेच्छा त्यांनी यावेळी दिल्या. नामदेव महाराज संस्थानच्या प्रलंबित मागण्यांची पूर्तता करण्यात येईल ,अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली. संस्थांच्या ट्रस्टीने त्यांना काही निवेदन यावेळेस सादर केले. तत्पूर्वी त्यांनी मंदिर परिसरात भेट देऊन समाधी दर्शन घेतले. यावेळी आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांनीही संबोधित केले. तत्पूर्वी, आज सकाळी नांदेड येथील श्री. गुरुगोविंद सिंह जी नांदेड विमानतळावर त्यांचे स्वागत करण्यात आले. या स्वागताला प्रतापराव पाटील चिखलीकर, आ.बालाजी कल्याणकर आ.आनंद शंकर तिडके, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले,महानगरपालिका आयुक्त डॉ. महेश डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी नांदेड येथील पवित्र श्री.हुजूर साहिब गुरूद्वारा अबचलनगर जाऊन दर्शन घेतले. गुरुद्वारा येथील ट्रस्टीमार्फत त्यांचे स्वागत करण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उमरज येथून त्यांनी नांदेड कडे प्रयाण केले रात्री उशिरा ते नांदेड विमानतळावरून मुंबईला परत जाणार आहेत.


**मासिक 'स्वराज दुनिया'**

तक्ता ४ (नियम ८ पहा)

दि. रजिस्ट्रेशन ऑफ न्यू पेपर (सेंट्रल) रुल्स १९५६ नियम क्र. ८ अन्वये मासिक 'स्वराज दुनिया' वृत्तपत्राची मालकी व इतर तपशिलासंबंधी निवेदन

| | |
|---|---|
| १) प्रकाशनस्थळ | - प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे - ४१२२०९ |
| २) प्रकाशनचा प्रसिद्धी काळ | - मासिक |
| ३) मुद्रकाचे नाव | - शिवाजी बबन खेडकर |
| राष्ट्रीयत्व | - भारतीय |
| पत्ता | - प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे - ४१२२०९ |
| ४) प्रकाशाचे नाव | - शिवाजी बबन खेडकर |
| राष्ट्रीयत्व | - भारतीय |
| पत्ता | - प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे - ४१२२०९ |
| ५) संपादकाचे नाव | - शिवाजी बबन खेडकर |
| राष्ट्रीयत्व | - भारतीय |
| पत्ता | - प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे - ४१२२०९ |
| ६) मालकाचे नाव | - शिवाजी बबन खेडकर |
| राष्ट्रीयत्व | - भारतीय |
| पत्ता | - प्रॉपर्टी नं. २५८५, गट नं. १०२६, जुना भांबर्डे रोड, रांजणगाव गणपती, ता. शिरूर, जि. पुणे - ४१२२०९ |

एकाहून अधिक भागीदार - नाही
असल्यास भागीदाराचे नाव

मी शिवाजी बबन खेडकर असे जाहीर करतो की, दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे आणि समजुतीप्रमाणे खरी व बरोबर आहे.

दिनांक ३ मार्च २०२५

**प्रकाशकाची सही**
**शिवाजी बबन खेडकर**


## शिक्षण आणि तंत्रज्ञानाद्वारे ग्रामीण भागाचा कायापालट शक्य - उपराष्ट्रपती जगदीप धनखड

**मुंबई :** नालंदा, तक्षशीला विद्यापीठांसारख्या संपन्न विद्याकेंद्रांची देदीप्यमान परंपरा आपल्याला लाभली आहे. ही परंपरा आपण जपली पाहिजे. शिक्षण आणि तंत्रज्ञान हे समाज परिवर्तन घडविणारे महत्त्वाचे घटक असून तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्रामीण भागाचा कायापालट घडविण्याचे आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केले. 'विकसित भारत' हे केवळ स्वप्न नसून निश्चित साध्य असल्याचेही उपराष्ट्रपती धनखड यांनी सांगितले.

यशवंतराव चव्हाण सेंटर येथे के.पी.बी हिंदुजा महाविद्यालयाचा अमृत महोत्सव कार्यक्रम झाला. यावेळी उपराष्ट्रपती यांच्या पत्नी सुदेश धनखड, राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, अध्यक्ष अशोक हिंदुजा, हर्षा हिंदुजा, पॉल अब्राहम, प्राचार्य चंद्रकला जोशी हे उपस्थित होते.

उपराष्ट्रपती जगदीश धनखड म्हणाले, आपला देश आर्थिक महासत्तेच्या दिशेने वाटचाल करत आहे. देशातील युवकशक्ती ही आपली मोठी जमेची बाजू आहे. अत्याधुनिक शिक्षण क्षेत्रात आपण अग्रेसर आहोत. नियोजन हा विकासाचा गाभा आहे. शिक्षण आणि तंत्रज्ञान हे समाज परिवर्तन घडविणारे घटक असून भविष्यात उद्योग क्षेत्राने शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक करून पायाभूत सुविधांबरोबरच दर्जे दार शिक्षणासाठीही योगदान द्यावे. कोणत्याही क्षेत्रातील संशोधन हे समाज उपयोगी असणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांनी स्व:अभ्यासाला अधिक महत्त्व द्यावे कारण शिक्षण ही आजीवन चालणारी प्रक्रिया असल्याचे श्री. धनखड यांनी सांगितले.

### माजी मुख्यमंत्री पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील यांना अभिवादन

**सांगली :** पद्मभूषण डॉ. वसंतदादा पाटील हे एक विद्यापीठ होते. त्यांचे विचार आजच्या काळातही नव्या पिढीला मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज येथे केले. राज्याचे माजी मुख्यमंत्री पद्मभूषण दिवंगत डॉ. वसंतरावदादा पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतिस्थळी आयोजित अभिवादन सभेत ते बोलत होते. ते सर्वसामान्य माणसाला आपले करणारे नेतृत्व होते.

# थकबाकीदारांना मालमत्ता कर भरण्यासाठी पाच मार्चपर्यंत मुदत

**पिंपरी :** महापालिकेच्या करआकारणी व करसंकलन विभागाने थकबाकी असलेल्या ५२० मालमत्तांचा लिलाव जाहीर केला आहे. थकबाकीदारांना थकबाकी भरण्यासाठी पाच मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. या मुदतीमध्ये थकबाकी न भरल्यास मालमत्तांचा लिलाव करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

करसंकलन विभागाकडून जप्ती मोहीम डिसेंबर २०२४ पासून तीव्र करण्यात आली. थकबाकी असलेल्या ८७७ मालमत्ता लाखबंद (सील) करून जप्त करण्यात आल्या. त्यात बिगरनिवासी, व्यावसायिक व मिश्र अशा मालमत्तांचा समावेश आहे. आतापर्यंत ३५७ मालमत्ताधारकांनी थकबाकी भरली आहे. या मालमत्तांची लाखबंदीची कारवाई मागे घेण्यात आली आहे. उर्वरित ५२० मालमत्तांची लिलावाची प्रक्रिया सुरू केली आहे. थकबाकीदारांना देयक भरण्यासाठी पाच मार्चपर्यंत अंतिम मुदत दिली आहे. जे कराचा भरणा करणार नाहीत, अशा मालमत्ताकरावर अधिकचा १५ टक्के लिलाव खर्च लावण्यात येणार आहे.

प्रत्यक्ष लिलाव प्रक्रिया सुरू झाल्यानंतर मालमत्ताधारकांना लिलावातून वाचवण्यासाठी मर्यादित संधी असणार आहे. मालमत्ताधारकांनी लिलावाची जाहीर सूचना प्रसिद्ध होईपर्यंत तत्काळ संपूर्ण थकीत कराचा भरणा करून लिलावप्रक्रिया टाळावी, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे यांनी केले आहे.

शहरामध्ये मालमत्ताकराची थकबाकी असणाऱ्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई सुरु असून तात्काळ कर भरुन जप्तीची कारवाई टाळण्याचे आवाहन वारंवार करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांपैकी ज्या मालमत्ताधारकांनी अद्यापही कराचा भरणा केला नाही अशा मालमत्तांच्या लिलावाची प्रक्रिया सुरु करणेत आली आहे. ज्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत अशा मालमत्ताधारकांनी थकीत कराचा संपूर्ण भरणा पाच मार्च २०२५ पूर्वी करुन आपल्या मालमत्तेचा लिलाव टाळावा, असेही आवाहन जांभळे यांनी केले.

## भामा आसखेड जलवाहिनी प्रकल्पाच्या खर्चात वाढ

३०० खांब हलविणार

**पिंपरी :** शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी हाती घेतलेल्या भामा आसखेड जलवाहिनीचे काम संथगतीने सुरू असताना कामाच्या खर्चातही विविध कारणांमुळे वाढ होत आहे. जलवाहिनी टाकण्याच्या कामाला अडथळा ठरणारे उच्चदाब वीज खांब हलविण्यासाठी महापालिकेच्या विद्युत विभागाने तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे खर्चात तीन कोटींनी वाढ होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या पाहता महापालिकेने आंद्रातून १०० आणि भामा आसखेड धरणातून १६७ असे २६७ एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन केले. धरणातून जलवाहिनीद्वारे पाणी आणण्यासाठी महापालिकेने २०२० मध्ये निविदा प्रक्रिया राबवून जलवाहिनी टाकण्याचे काम ऑफशोअर इंडिया लि. या ठेकेदाराला दिले. या कामाची चार वर्षांची मुदत संपली, तरी हे काम अपूर्णच आहे. या जलवाहिनीचे काम ५० टक्केच पूर्ण झाले आहे. नवलाख उंब्रेपासून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत जलवाहिनी टाकण्यात येत आहे. जलवाहिनीचे संपूर्ण काम १६२ कोटी रुपयांचे आहे. याचा कार्यारंभ आदेश १५ डिसेंबर २०२० रोजी दिला होता. कामाची मुदत १५ डिसेंबर २०२४ अशी चार वर्षांची होती. मात्र, या मुदतीत १९ किलोमीटरपैकी केवळ नऊ किलोमीटर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली आहे.

खेड येथील वाकीतर्फे वाडा येथील अशुद्ध जलउपसा केंद्रापासून इंदोरीपर्यंत जलवाहिनीच्या कामाला ३०० उच्चदाब खांब अडथळा ठरत आहेत. हे खांब हलविण्यासाठी महापालिकेने सात दिवसांच्या अल्पमुदतीची तीन कोटी चार लाख ६३ हजार ४४८ रुपयांची निविदा प्रसिद्ध केली आहे. महावितरणच्या परवानगीनंतर शुल्क भरून हे काम हाती घेतले जाणार आहे. त्यासाठी एक वर्षाचा कालावधी लागणार आहे.

आंद्रा धरणातील पाणी नवलाख उंब्रे येथून एकाच जलवाहिनीतून चिखलीतील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत आणण्यात येणार आहे. त्यासाठी साडेसात किलोमीटर जलवाहिनी टाकण्यात येणार आहे. परंतु, या कामाला अद्याप सुरुवात झाली नाही. सध्या इंद्रायणी नदीतून निघोजे बंधाऱ्यातून पाणी उचलले जाते. भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेतील जलवाहिनीला अडथळा ठरणारे उच्चदाब खांब हलविण्यात येणार आहेत. त्यासाठी सात दिवसांची निविदा प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे विद्युत विभागाचे सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले यांनी सांगितले.

## प्रेमप्रकरणात झिडकारल्याने तरुणाची रेल्वेखाली आत्महत्या

- **आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तरुणीविरुद्ध गुन्हा**

**पुणे :** विवाहास नकार दिल्याने तरुणाने रेल्वेखाली आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागात नुकतीच घडली. तरुणाला आत्महत्येस प्रवृत्त करणे, तसेच त्याच्याकडून वेळोवेळी पैसे घेऊन फसवणूक केल्याप्रकरणी एका तरुणीविरुद्ध वानवडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.गणेश राजू सिंग (वय ३०, रा. गोसावी वस्ती, वैदुवाडी, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी एका तरुणीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सिंग याची विवाहित बहीण गौरी राजेंद्र कांबळे (वय ३३, रा. इंदिरानगर, ससाणेनगर, हडपसर) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश आणि त्याची आई वैदुवाडी भागात राहायला आहेत. त्याची आई मगरपट्टा भागात घरकाम करुन उदरनिर्वाह करते. गणेश हा शेवाळवाडीतील खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्या थांब्यावर पाण्याच्या बाटल्यांची विक्री करायचा. त्याच्या घराशेजारी तरुणी राहायला आहे. गेल्या चार वर्षांपासून दोघांमध्ये प्रेमसंबंध होते. दोघांनी कुटुंबीयांना विवाह करणार असल्याचे सांगितले होते.

ती नेहमी गणेशकडून कपडे खरेदीसाठी पैसे घ्यायची. ती घरातील किराणा माल भरण्यासाठी त्याच्याकडून पैसे घ्यायची. तरुणी एका व्यायामशाळेत कामाला होती. तिला सोडायला तो दररोज सकाळी जायचा. तिने दुचाकी घेतली होती. दुचाकीचे हप्ते तो भरत होता. किरकोळ कारणावरुन ती त्याला त्रास द्यायची. गणेशच्या मित्रांनी तिला समजावून सांगितले होते. काही दिवसांपासून तिने गणेश याच्याशी बोलणे सोडले होते.

## हॉटेल पाडलं, पिस्तुल बाळगलं

**पिंपरी :** पिस्तुल बाळगणाऱ्या व्यक्तीला मालमत्ता गुन्हे विरोधी पथकाने अटक केली आहे. अरबाज सैफल शेख अस अटक करण्यात आलेल्या आरोपीच नाव आहे. भोसरी पोलीस ठाण्यात आर्म ऍक्ट नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी अरबाज सैफल शेख हा हॉटेल व्यवसायिक होता. रस्ता रुंदीकरणामध्ये त्याच हॉटेल पाडण्यात आलं. सध्या तो बेरोजगार होता. काही मित्र गुंड प्रवृत्ती चे असल्याने पैकी एकाने त्याला पिस्तुल आणि एक जिवंत काडतुस दिले होते.

याबाबत ची माहिती मालमत्ता विरोधी पथकातील पोलीस कर्मचारी विशाल गायकवाड, गणेश हिंगे, गणेश सावंत, सुमित देवकर हर्षद कदम यांना मिळाली होती. हे सर्व जण पेट्रोलिंग करत असताना भोसरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेतलं.

त्याच्याकडे एक पिस्तुल आणि एक जिवंत काडतुस जप्त करण्यात आलं आहे. आर्म ऍक्ट नुसार भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास भोसरी पोलीस करत असून ही कारवाई मालमत्ता विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक विजय ढमाल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

## शहरात वेगवेगळ्या अपघातात तिघांचा मृत्यू

**पुणे :** शहरात वेगवेगळ्या अपघातात ज्येष्ठ नागरिकासह तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. नवले पूल, नगर रस्ता, हडपसर भागातील रामटेकडी परिसरात अपघाताच्या घटना घडल्या. मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावरील नवले पुल परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत ज्येष्ठ नागरिकाचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली. जगजीवन कोरंगा शेट्टी (वय ७४, रा. श्री हरिकृपा, कोरग्रावाडी, जि. उडपी, कर्नाटक) असे मृत्युमुखी पडलेल्या ज्येष्ठ नागरिकाचे नाव आहे. याबाबत बेबी जगजीवन शेट्टी (वय ६९) यांनी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नगर रस्त्यावर लोणीकंद परिसरात भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली. रमेश राजेंद्र गायकवाड (वय ४२, रा. वाडेगाव, ता. शिरुर, जि. पुणे ) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. याबाबत गायकवाड यांची पत्नी कविता (वय ३७) यांनी लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दुचाकीस्वार रमेश हे लोणीकंद परिसरातील थेऊर रस्त्याने निघाले होते. त्या वेळी भरधाव वाहनाने दुचाकीस्वार गायकवाड यांना धडक दिली. अपघातात गायकवाड यांचा मृत्यू झाला.

एसटीच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना पुणे-सोलापूर रस्त्यावरील हडपसर भागात घडली. काळूराम नंदकुमार जाधव (वय ५०, रा. भेकराईनगर, फुरसुंगी, हडपसर) असे मृत्युमुखी पडलेल्या पादचाऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी एसटी बसचालक मिलिंद तुकाराम कांबळे (वय ४२, रा. खासापुरी, परांडा, जि. धाराशिव) याला अटक करण्यात आली. याबाबत पोलीस कर्मचारी संतोष कांबळे यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. जाधव हे शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास पुणे-सोलापूर रस्त्यावरील रामटेकडी परिसरातून निघाले होते. त्यावेळी उड्डाणपुलावर भरधाव एसटी बसने पादचारी जाधव यांना धडक दिली. अपघातात जाधव यांचा जागीच मृत्यू झाला.

## कर्नाटकात पोलिसाचा खून करुन ११ वर्षे फरारी आरोपीला पुण्यात अटक

**पुणे :** कर्नाटकात पोलीस कर्मचाऱ्याचा खून प्रकरणात गेले ११ वर्ष पोलिसांना गुंगारा देणारा एकाला हडपसर भागातील फुरसुंगी परिसरातून अटक करण्यात आली. विजापूरच्या शासकीय रुग्णालयातून आरोपी पसार झाला होता. तपासासाठी त्याला कर्नाटक पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, फरार झाल्यनंतर त्याने दोन विवाह केल्याचे तपासात उघडकीस आले आहे.अमरीश काशीनाथ कोळी (वय ४५, रा.कलबुर्गी, कर्नाटक, सध्या रा. गंगानगर, फुरसुंगी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. कोळी याने तीन विवाह केले आहे. त्याच्या दोन पत्नी सोलापूरमध्ये राहायला आहेत. कर्नाटकातील गुलबर्गा परिसरात त्याची एक पत्नी राहायला आहेत. कर्नाटकात पोलीस कर्मचाऱ्याचा खून केल्याप्रकरणी त्याला अटक करण्यात आली होती. कारागृहातून त्याला उपाचारासाठी विजापूर येथील रुग्णालयात पाठविण्याथ आले होते. रुग्णालयातून तो पसार झाला होता. त्याला न्यायालयाने फरारी घोषित केले होते.

## सोमेश्वर कारखान्याच्या गैरव्यवहार प्रकरणातील संबंधित विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यावर कारवाई करणार - पुरुषोत्तम जगताप

**बारामती :** बारामती तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यात कथिक आर्थिक गैरव्यवहारा प्रकरणी कारखान्यातील संबंधित विभागातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे निलंबन व तात्काळ गुन्हा दाखल करणार, अशी माहिती कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविली आहे.

श्री. सोमेश्वर सहकारी साखर कारखान्यामध्ये रोजंदारी तत्त्वावर काम करणाऱ्या कर्मचारी व कामगार यांची हजेरी नोंदीमध्ये संगनमताने कारखाना प्रशासनाची फसवणूक करून आर्थिक घोटाळा केल्याप्रकरणी साखर कारखान्याचे लेबर व टाइम ऑफिस विभागातील लेबर ऑफिसर, हेअर टाईम कीपर, टाईम कीपर, सर्व क्लार्क व कर्मचारी यांचे निलंबन करण्याचा निर्णय साखर कारखान्याच्या संचालक मंडळाने २७ फेब्रुवारी २०२५ पार पडलेल्या कार्यकारी मंडळाच्या सभेमध्ये घेतला असून सोबतच या सर्वांनी विरोधात व लेबर पुरवठा करणाऱ्या कंत्राटदार यांच्यावर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करणार असल्याची माहिती श्री.सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष पुरुषोत्तम जगताप यांनी दिली.

श्री. जगताप यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात असे म्हटले आहे की, आपल्या श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना हा सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर असताना कारखान्याच्या कामकाजामध्ये चुकीचे काम करणाऱ्या कोणत्याही घटकाला पाठीशी घालू नये, अशी कारखान्याच्या मार्गदर्शक व राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी संचालक मंडळात वेळोवेळी सूचना केलेली आहे.

# चार तलावांच्या सौंदर्यीकरणासाठी दोन कोटींचा खर्च !

पुणे : पुणे शहरातील कात्रज, पाषाण, पेशवे तसेच मॉडेल कॉलनी येथील तलावांचे सुशोभीकरण केले जाणार असून यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी खर्च केला जाणार आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत ही कामे केली जाणार आहेत. यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत या निविदांना मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या वतीने दर वर्षी शहरातील जलपर्णी काढण्यासाठी खर्च केला जातो. तसेच, तलावांच्या स्वच्छतेसाठीदेखील खर्च होतो. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मोहिमेंतर्गत



महापालिकेला दोन कोटी रुपयांचा निधी तलावांच्या सुशोभीकरणासाठी महापालिकेला मिळाला होता. त्यामधून शहरातील चार तलावांच्या सुशोभीकरणाचे काम केले जाणार आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाने याच्या निविदा काढल्या होत्या.

पाषाण तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये, कात्रज तलावासाठी ४१ लाख ८८ हजार रुपये आणि मॉडेल कॉलनी तलावासाठी ४९ लाख ४२ हजार लाख रुपये खर्च केले जाणार आहेत. तसेच, पेशवे तलावासाठी ४९ लाख रुपयांच्या निविदा काढण्यात आल्या होत्या. त्याला मान्यता देण्याचे प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीसमोर सादर करण्यात आले होते. त्याला स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

या प्रकल्पात तलावाच्या परिसरात झाडे लावणे, काँक्रीटचे रस्ते तयार करणे, कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे आणि तलावाभोवती जॉगिंग ट्रॅक बांधणे असे प्रस्तावित आहे. तलावांजवळ कचरा टाकणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे.

ड्रेनेजमुळे पाणी दूषित होत असल्याने, तलाव स्वच्छ करण्याचे काम महापालिकेने हाती घेतले आहे. २०१७ मध्ये, महापालिकेने कात्रज तलावात येणाऱ्या प्रक्रिया न केलेल्या पाण्यासाठी ड्रेनेज यंत्रणा तयार केली. शिवाय, महापालिकेकडून सध्या दररोज दोन दशलक्ष लिटर क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प बांधला जात आहे. पुणे शहर राहण्यासाठी सुंदर आणि प्रदूषणमुक्त करण्याचा प्रयत्न केला जात आहे. हवेची गुणवत्ता ढासळत असताना या प्रकल्पांमुळे पर्यावरणाचे संतुलन राखण्यास मदत होणार आहे, असे या प्रस्तावांमध्ये म्हटले आहे.